संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्त तीन वाहनांच्या दुरूस्तीवर सन २०१५-१६ या आर्थीक वर्षात झालेल्या खर्चास मंजूरी.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः वाहनदुरूस्ती-२०१५/ प्र.क्र.१८६/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.
तारीखः २ फेब्रुवारी, २०१६.

वाचा

1. **सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/ आस्था/ कक्ष-५/ टे-२/ वा. दु. प्रशा.मान्यता/ २३१८-२०/१५, दि.२९.०९.२०१५.**
2. **सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई यांचे पत्र क्रमांकः संआसे/ कक्ष-५/ टे-६/ वाहन दुरूस्ती/ १४१-४२/ १६, दि.६.०१.२०१६.**

प्रस्तावना

संदर्भाधीन पत्रान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील संचालक, आरोग्य सेवा, मुंबई या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या व सद्यस्थितीत मा.मंत्री (आरोग्य), मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांच्या वापरात असलेल्या तीन वाहनांच्या दुरूस्तीवर सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर तीन वाहनांच्या दुरूस्तीकरीता सन २०१५-१६ या वर्षात झालेल्या खर्चाची देयके प्रस्तावासोबत सादर करण्यात आली असून सदरचा खर्च वाजवी असल्याबाबत विभागाच्या अधिनस्त संबंधित सेवा व्यवस्थापक, जिल्हा कार्यशाळा, आरोग्य सेवा यांनी प्रमाणित केलेले आहे. या अनुषंगाने सदर वाहनावरील दुरूस्तीकरीता झालेल्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय

या शासन निर्णयान्वये सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रशासनिक नियंत्रणाखालील संचालक, आरोग्य सेवा, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या व सद्यस्थितीत मा.मंत्री (आरोग्य) आणि मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांच्या वापरात असलेल्या खालीलप्रमाणे नमूद केलेल्या वाहनांच्या दुरूस्तीवर सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात झालेल्या त्यांच्यासमोर दर्शविण्यात आलेल्या खर्चास शासनाची प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे.

अ. क्र.	वाहन क्रमांक व कंपनी	वाहन वापरणारे अधिकारी/ पदाधिकारी	दुरूस्तीवर सन२०१५-१६ मध्ये झालेल्या खर्चाची रक्कम रू.
१.	एमएच-१२ एएच ९९९८ (होंडा सिटी)-पेट्रोल	मा.मंत्री (आरोग्य)	५५,९९३/-
२.	एमएच-१२ आरआर ६०७ (टोयोटा इनोव्हा)-डिझेल	मा.मंत्री (आरोग्य)	८३,५७९/-
३.	एमएच-१२ एएच ७०८९ (होंडा सिटी)-पेट्रोल	मा.राज्यमंत्री (आरोग्य)	१,००,३२९/-

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/ विनियम,भाग-२, दि.१७.०४.२०१५ सोबतच्या परिशिष्टातील भाग-पहिला, उपविभाग-२ मधील अनुक्रमांक १९ येथील नियम क्रमांक ६९ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१६०२०२१७१०११५८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ashok T Uike

Digitally signed by Ashok T Uike
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400001, st=Maharashtra, cn=Ashok T Uike
Date: 2016.02.03 11:08:04 +05'30'

अ.ता.उईके
अवर सचिव महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
२. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
३. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
५. उपसंचालक, आरोग्य सेवा (परिवहन), पुणे.
६. जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
७. महालेखापाल १ / २, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
८. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१०. निवडनस्ती (आरोग्य-४).